जा.क्र.आस्था-३(१)/पो.भ.-१७/नियुक्ती आदेश क्र.-६/२०१७,
पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,पुणे
दिनांक २९/०९/२०१७

संदर्भः- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११
विषयः- **पोलीस भरती - २०१७**
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

---ooo---

## नियुक्ती आदेश :-

पुणे शहर पोलीस घटकांत रिक्त असलेल्या/होणा-या पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया दिनांक २२/०३/२०१७ ते ३०/०४/२०१७ या कालावधीत पार पडली. सदर पोलीस भरती दरम्यान मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत गुणानुक्रम,सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद पुरुष व महिला उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील उमेदवारांना पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर **"पोलीस शिपाई/चालक पोलीस शिपाई (गट-क)"** या संवर्गात वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० +२००० ग्रेड पे (अधिक रुपये ५०० /- विशेष वेतन) यामध्ये मुळवेतन रुपये ६४६०+२०००ग्रेड पे + ५०० विशेष वेतन या वेतनावर पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर येथे दिनांक ३०/०९/२०१७ पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहुन अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवारांची नावे | लिंग | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण | छाती | उंची | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1462 | VAIBHAV SHANKAR MANE | M | Open | Open | Police Boy | 87-92 | 173.0 | 162 |
| 2. | 2037 | RANJIT SURYKANT NAWADKAR | M | Open | Open | Police Boy | 84-93 | 171.3 | 161 |
| 3. | 2041 | BHUSHAN PRAKASH CHAVAN | M | OBC | OBC | Police Boy | 81-88 | 183.1 | 148 |
| 4. | 3888 | VIKAS MANOHAR ADAKE | M | Open | Open | Police Boy | 90-95 | 174.1 | 166 |
| 5. | 4077 | VISHAL BABURAO TOPALE | M | Open | Open | EQ | 95-100 | 168.8 | 163 |
| 6. | 7912 | CHETAN DILIP CHAVAN | M | Open | Open | Police Boy | 96-102 | 175.2 | 157 |
| 7. | 15152 | SOMANATH PANDIT BHOSALE | M | Open | Open | None | 88-99 | 177.0 | 180 |
| 8. | 19147 | SUNIL VASANTRAO KHORE | M | Open | Open | Exman | 87-93 | 174.2 | 155 |
| 9. | 15803 | DNYANESHWAR LAHU LOKHANDE | M | Open | Open | HG | 83-92 | 173.5 | 171 |
| 10. | 19001 | VITHAL KISAN SUTAR | M | OBC | OBC | Exman | 91-98 | 176.5 | 146 |
| 11. | 20499 | KOMAL PANDURANG KAPASE | F | Open | Open | Women | NA | 159.5 | 162 |
| 12. | 21105 | RUPALI RAOSAHEB IDHATE | F | OBC | OBC | Women | NA | 160.0 | 145 |
| 13. | 21302 | NIKITA NIVRUTTI GAYKAR | F | OBC | OBC | Women | NA | 159.5 | 154 |
| 14. | 21514 | AARTI SHIVAJI JADHAV | F | ST | ST | Women | NA | 161.6 | 131 |
| 15. | 22295 | MANISHA HANUMAN UBALE | F | Open | Open | Women | NA | 160.5 | 170 |
| 16. | 22315 | ASHWINI SITARAM SONNAR | F | Open | Open | Women | NA | 164.7 | 168 |
| 17. | 22611 | BHARATI MANJABAPU GHOGARE | F | Open | Open | Women | NA | 167.9 | 156 |
| 18. | 22715 | AASMA AYUB SHEKH | F | Open | Open | Women | NA | 155.2 | 151 |

## अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

२. महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.,शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२-१२-२०११ नुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहुन निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधीत जात पडताळणी समितीन